दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)




पुणे ॥ वर्ष ६ वे ॥ अंक ४८ ॥ शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६ ॥ RNI No.MAHMAR/2014/54581 ॥ Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 ॥ पाने ४ किंमत २ रुपये ॥


## धर्मांतर केले किंवा आंतरजातीय विवाह, व्यक्तीची जात बदलत नाही : अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निरीक्षण

अलाहाबाद : एखादी व्यक्ती धर्म बदलू शकते; मात्र धर्मांतर करूनही त्याची जात कायम राहते. म्हणून, लग्नामुळे व्यक्तीची जात बदलत नाही. महिलेने आंतरजातीय विवाह केला तरी जन्माच्या वेळी असणारी तिची जात कायम राहते असे महत्त्वपूर्ण निरीक्षण अलाहाबाद उच्च न्यायालयाने नोंदवले.

आरोपींनी आपल्याला मारहाण केली, शिवीगाळ केली आणि वादादरम्यान जातीवाचक शब्दांचा वापर करून अपमानित केले, असा आरोप तक्रारदार महिलेने केला होता. मारहाणीत स्वत:सह इतर दोन जण जखमी झाल्याचा दावा तिने केला होता. या प्रकरणी ९ संशयित आरोपींवर गुन्हे दाखल झाले. यानंतर अलीगडमधील विशेष (अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायदा) न्यायालयाने या आरोपींविरुद्ध भादंवि कलम ३२३, ५०६, ४५२, ३५४ आणि अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३(१)(आर) अंतर्गत खटला चालवण्यासाठी संशयित आरोपींविरोधात समन्स जारी केले होते. या कारवाईला संशयितांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. यावर न्यायमूर्ती अनिल कुमार-दहावे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

संशयितांच्या वकिलांचा युक्तिवाद

तक्रारदार महिला मूळची पश्चिम बंगालमधील आहे. ती जन्माने अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गातील असली, तरी तिने 'जाट' समाजातील व्यक्तीशी विवाह केला आहे. विवाहामुळे तिचे जातीचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. विवाहानंतर महिला पतीच्या जातीची मानली जाते आणि तिची जन्माची जात बदलते, त्यामुळे अनुसूचित जाती-जमाती कायद्यांतर्गत गुन्हा लागू होऊ शकत नाही असा युक्तिवाद संशयित आरोपींच्या वकिलांनी केला होता. तसेच,




पूर्ववैमनस्यातून खोटी तक्रार दाखल केल्याचाही दावा केला होता. सरकारी वकिलांनी या युक्तिवादाला विरोध केला. दोन्ही पक्षांनी दाखल केलेले गुन्हे एकाच दिवशी घडल्याने हा केवळ पूर्ववैमनस्यातून तक्रार दाखल केली असे म्हणता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

जात बदलत नाहीच : उच्च न्यायालय

न्यायमूर्ती अनिल कुमार-दहावे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की व्यक्तीने धर्म बदलला तरी तिची जात बदलत नाही. त्याचप्रमाणे, विवाह झाल्यामुळे एखाद्या महिलेची जन्माने मिळालेली जात बदलली जात नाही. त्यामुळे आरोपींचा हा युक्तिवाद कायद्यात टिकणारा नाही, असे स्पष्ट करत तक्रारदार महिला आणि साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय अहवाल विचारात घेतल्यानंतरच सत्र न्यायालयाने अपीलकर्त्यांना समन्स बजावले होते. तसेच, परस्परविरोधी खटल्याचे अस्तित्व हे विरोधी पक्षाने प्रतिस्पर्ध्याच्या बाजूने दाखल केलेली तक्रार रद्द करण्याचा आधार बनत नाही, असे नमूद करत कारवाई रद्द करण्यात यावी, अशी मागणी करणारे अपील उच्च न्यायालयाने फेटाळून लावले.

## एनए परवानगी इतिहासजमा; महसूल विभागाचा मोठा निर्णय; बांधकाम नकाशा हीच परवानगी समजणार

मुंबई : शेतजमिनीच्या निवासी, व्यावसायिक किंवा औद्योगिक वापरासाठी लागणारी बिनशेती अथवा अकृषिक (एन.ए.) परवानगीची अट आता कायमची रद्द करण्यात आली आहे. राज्य सरकारने त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार कमी करून ते थेट स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. त्यानुसार नगररचना विभाग आणि स्थानिक प्राधिकरणाने दिलेली बांधकाम नकाशा परवानगी हीच 'एनए' परवानगी असणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र बांधकाम परवानगीची गरज नाही. याशिवाय वार्षिक बिनशेती करदेखील रद्द करून राज्य सरकारने शेतजमीनधारकांना मोठा दिलासा दिला आहे.

आतापर्यंत शेतजमीन बिनशेती करण्यासाठी जमीनमालकाला प्रथम स्थानिक प्राधिकरणाकडून बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर करावा लागत होता. त्यानंतर तो प्रस्ताव स्थानिक स्वराज्य संस्थेकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे अंतिम मान्यतेसाठी पाठवला जात होता. या दुहेरी प्रक्रियेमुळे नागरिकांचा वेळ जात होता. अशी प्रकरणे प्रलंबित राहत असल्याने नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागत होत्या.

या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार शेतजमीन बिनशेती करण्यासाठी लागणारी स्वतंत्र परवानगीची सक्ती रद्द केली आहे. त्यासाठी महाराष्ट्र



जमीन महसूल संहितेत बदल करून तसे राजपत्र प्रसिद्ध केले आहे.

अनेक बँका कर्ज देताना अकृषक सनदेचा आग्रह धरतात. मात्र, नियोजन प्राधिकरणाची परवानगी मिळाल्यावर बँकांनी सनदेसाठी आग्रह धरू नये. जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश सर्व बँकांच्या निदर्शनास आणून द्यावेत, असेही निर्देश महसूल विभागाने दिले आहेत. दरम्यान, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत सुधारणा करण्याबाबत हिवाळी अधिवेशनात याबाबतची रूपरेषा ठरली होती. त्यानुसार हा निर्णय घेत सरकारने सर्वसामान्य जनतेला दिलासा दिला आहे. हे सरकार जनतेच्या कल्याणासाठी काम करते, याचे प्रत्यंतर देणारा हा निर्णय आहे, असे महसूलमंत्री बावनकुळे यांनी म्हटले आहे.

नव्या नियमांबरोबरच बांधकाम परवानगीसाठी 'बीपीएमएस' किंवा 'ऑटो डीसीआर'द्वारे ऑनलाईन अर्ज करता येणार असून बांधकाम परवानगी मिळताच महसूल विभागाच्या संगणकीय प्रणालीद्वारे ७/१२ उताऱ्यात आपोआप फेरफार नोंद घेतली जाणार आहे. केवळ बांधकाम परवानगी मिळाली म्हणून भोगवटादार वर्ग-२ च्या (कमी श्रमाच्या जमिनी) दर्जामध्ये बदल होणार नाही. त्यांच्यासाठी आवश्यक असलेले नजराणा शुल्क भरावेच लागणार आहे, असे महसूल विभागाने स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज नाही

नव्या नियमानुसार जर एखाद्या जमिनीचा वापर विकास आराखड्यानुसार अनुज्ञेय असेल तर नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम परवानगी हीच अकृषक परवानगी मानली जाईल. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची किंवा सनदेची गरज राहणार नाही.

नागरिकांची जुन्या थकबाकीतून मुक्तता

ज्या नागरिकांचा अकृषक कर थकीत आहे, त्यांना दिलासा देताना राज्य सरकारने या सुधारणेच्या दिनांकापर्यंतचा थकीत कर वसूल करण्यापासून सूट दिली आहे. मात्र, ज्या जमिनी २००१ पूर्वी किंवा त्यानंतर बिनशेती झाल्या आहेत, त्यांच्या मालकांना या शासन निर्णयापासून एक वर्षाच्या आत विहित दराने एकरकमी अधिमूल्य भरावे लागणार आहे.

एकवेळचा रुपांतरण दर

दरवर्षी भरावा लागणारा अकृषक कर रद्द करून त्याऐवजी जमिनीच्या बाजारमूल्यानुसार टप्पानिहाय एकरकमी रुपांतरण अधिमूल्य आकारले जाईल. त्यासाठी १ हजार चौ.मी.पर्यंतच्या क्षेत्रफळासाठी चालू बाजारमूल्याच्या ०.१० टक्के, तर १००१ ते ४००० चौ.मी.पर्यंतच्या क्षेत्रफळासाठी ०.२५ टक्के आणि ४ हजार चौ.मी.पेक्षा जास्त असलेल्या क्षेत्रफळासाठी चालू बाजारमूल्याच्या ०.५० टक्क्यानुसार दर आकारले जाणार आहेत.

## कोल्हापूर-मुंबई मार्गावर आता संध्याकाळीही विमानसेवा; २ मार्चपासून सुरूवात, बघा वेळापत्रक

कोल्हापूर : सध्या केवळ सकाळच्या वेळेतच सुरू असलेली कोल्हापूर ते मुंबई ही विमानसेवा येत्या २ मार्चपासून सायंकाळच्या वेळेतही सुरू होणार आहे. सुरुवातीला, आठवड्यातील फक्त दोन दिवस (मंगळवार व गुरुवार) सायंकाळची विमानसेवा असेल; पण लवकरच संपूर्ण आठवडाभर सायंकाळची




विमानसेवा सुरू करण्याचा प्रयत्न असणार आहे. खासदार धनंजय महाडिक यांनी याबाबत माहिती दिली.

कोल्हापूर-मुंबई विमानसेवेचे वेळापत्रक

सध्या कोल्हापुरातून मुंबई, बंगळुरू, हैदराबाद, तिरुपती आणि अहमदाबाद या मार्गांवर प्रवासी विमानसेवा सुरू आहे. खासदार महाडिक यांच्या प्रयत्नातून २ मार्चपासून कोल्हापूर-मुंबई मार्गावर सकाळी आणि सायंकाळी अशा दोन्ही वेळा विमानसेवा उपलब्ध होणार आहे. सायंकाळी साडेचार वाजता, मुंबईहून स्टार एअरवेजचे विमान कोल्हापूरकडे उड्डाण करेल, आणि सायंकाळी पाच वाजून ३५ मिनिटांनी कोल्हापूरला पोहोचेल. सायंकाळी सहा वाजून ५ मिनिटांनी, कोल्हापूर विमानतळावरून पुन्हा मुंबईकडे विमान उड्डाण करेल, आणि सायंकाळी सात वाजून १० मिनिटांनी मुंबईत पोहोचेल. पहिल्या टप्प्यात दर मंगळवार व गुरुवार या सत्रातच स्टार एअरवेजची विमानसेवा प्रवाशांसाठी उपलब्ध असेल.

लवकरच संपूर्ण आठवडाभर सेवा

लवकरच, आठवड्याचे सातही दिवस सायंकाळच्या सत्रातील कोल्हापूर-मुंबई विमानसेवा सुरू करण्याचा प्रयत्न असेल. तसेच सध्याच्या सायंकाळी साडेचार वाजेच्या उड्डाणाऐवजी संध्याकाळी सात-साडेसातनंतर मुंबईहून विमान उड्डाण करण्याची योजना आहे, असे खासदार धनंजय महाडिक यांनी सांगितले. सकाळी व संध्याकाळी अशा दोन वेळा विमानसेवा सुरू झाल्यामुळे प्रवाशांची मोठी सोय झाली आहे.

## नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुप्तवार्ता पथकाचा धडाका; फसवणूक करणाऱ्या टोळ्यांचे मोडले कंबरडे

नवी मुंबई : सर्वसामान्यांची आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी आणि गुन्हे घडण्यापूर्वीच त्याला पायबंद घालण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात स्थापन करण्यात आलेल्या आर्थिक गुप्तवार्ता पथकाने (फायनान्शियल इंटेलिजन्स युनिट) वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. केवळ जनजागृतीच नव्हे, तर गुप्त माहितीच्या आधारे धडक कारवाया करत या पथकाने फसवणूक करणाऱ्या टोळ्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे नागरिकांची मोठया प्रमाणात होणारी संभाव्य फसवणूक रोखण्यात पोलिसांना यश आले आहे.

डिसेंबर २०२३ च्या हिवाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी प्रत्येक जिह्यात फायनान्शियल इंटेलिजेन्स युनिट (एफ आय यु) स्थापन करण्याचे आश्वासन दिले होते.



गृहमंत्र्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नागरिकांच्या कष्टाचा पैसा सुरक्षित राहावा, या उद्देशाने २०२३ रोजी राज्यात सर्वप्रथम आर्थिक गुप्तवार्ता (एफआययु) या विशेष पथकाची स्थापना केली.

आर्थिक गुप्तवार्ता पथकाने (एफआयु) १ जानेवारी २०२४ पासून आतापर्यंतच्या कालावधीत अनेक धडक कारवाया केल्या. यात आर्थिक गुप्तवार्ता पथकाने जीएसटी विभागाच्या मदतीने बोल्ड विंग या आस्थापनेवर ३६ लाख रुपयांची दंडात्मक कारवाई केली. तसेच आतापर्यंत एकूण २१ गुन्हे दाखल केले असून फसवणुकीच्या ४३ तक्रार अर्जांवर चौकशी सुरु आहे. त्याचप्रमाणे संशयास्पद कंपन्या आणि कार्यालयांची ४९३ वेळा गोपनीय तपासणी करुन संभाव्य फसवणूक टाळण्यात आली आहे. त्याशिवाय नागरिकांना सावध करण्यासाठी आर्थिक गुप्तवार्ता पथकाकडून १३ विशेष कार्यक्रम राबवण्यात आले. तसेच शहरात शेकडो बॅनर्स लावून जनजागृती करण्यात आली.

कोणत्या क्षेत्रात सर्वाधिक गुन्हे?

दाखल झालेल्या २१ गुह्यांचे विश्लेषण केले असता, फसवणुकीचे नवे ट्रेंड्स समोर आले आहेत, यात नोकरीचे आमिषाने फसवणूकीचे ६ गुन्हे, अधिकचा परतावा देण्याचे आमिष (पॉन्झी स्कीम): ४ गुन्हे, एमएलएम व रिअल इस्टेट-प्रत्येकी २ गुन्हे. शेअर मार्केट व फॉरेक्स ट्रेडिंग १-१ गुन्हा, तसेच शैक्षणिक प्रवेश, बनावट नोटा आणि विदेशी आयात-निर्यात अशा विविध क्षेत्रांतही पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

सावध राहा! या स्कीम्सपासून दूर राहा

आर्थिक गुप्तवार्ता पथकाने नागरिकांना विशेषतः: पॉन्झी स्कीम, क्रिप्टो करन्सी, शेअर मार्केटमधील अनधिकृत गुंतवणूक आणि कमी वेळात दुप्पट पैसे अशा प्रलोभनांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. बँका किंवा पतपेढयामध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी त्यांची अधिकृतता तपासणे गरजेचे आहे. नागरिकांनी कोणत्याही भूलथापांना बळी पडू नये. कोठेही संशयास्पद गुंतवणूक किंवा फसवणूक होत असल्याचे आढळल्यास तातडीने आर्थिक गुप्तवार्ता पथकाच्या हेल्पलाइनवर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

– प्रेरणा कट्टे, सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, नवी मुंबई

सूर्योदय
शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६

संपादकीय

## विकास महामंडळ

सध्या मध्य आणि पश्चिम रेल्वेवर सुमारे ३,२०० हून अधिक लोकल धावतात. प्रवाशांना गर्दीमुक्त आणि अद्ययावत प्रवास सुविधा देण्यासाठी २३८ वातानुकूलित लोकल चालवण्यात येणार आहेत. या नवीन वातानुकूलित लोकलमध्ये आरामदायी आसन व्यवस्था, आधुनिक रचना, ऑक्सिजन नियंत्रक व्यवस्था या करण्यात येणार आहेत. तसेच मुंबई महानगरातील रेल्वे प्रवाशांसाठी १६ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू आहेत. हे प्रकल्प टप्प्याटप्प्याने केले जात आहेत, मेट्रोच्या धर्तीवर नव्या रचनेची लोकल तयार केली जाणार आहे. लोकलमध्ये ऑक्सिजन नियंत्रक प्रणाली सुरू करून, प्रवाशांचा प्रवास सुखकर होईल. गर्दी, उष्णता आणि प्रवासातील त्रास कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळ (एमआरव्हीसी) आणि भारतीय रेल्वे यांच्या माध्यमातून हा प्रकल्प राबवण्यात येणार असून, टप्प्याटप्प्याने या लोकल सेवेत येतील. वातानुकूलित लोकलमुळे खासगी वाहनांचा वापर कमी होऊन पर्यावरणपूरक प्रवासाला चालना मिळेल. मुंबई लोकल ही मुंबईकरांची जीवनवाहिनी मानली जाते. २३८ वातानुकूलित लोकल चालवण्यास सुरुवात केल्यास मुंबईकरांसाठी दिलासादायक ठरणार आहे. तसेच प्रवाशांचा दर्जा उंचावणार. नवीन वातानुकूलित लोकल चालवण्यास सुरुवात केल्यास एकूण प्रवाशांच्या ६० टक्के प्रवाशांचा प्रवास सुखर होण्याची अपेक्षा आहे. उपनगरीय लोकलमधून दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांचा प्रवास सुखकर करण्यासाठी रेल्वे आणि एमआरव्हीसीमार्फत अनेक प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

मुंबई उपनगरीय रेल्वेवर मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रकल्प (एमयूटीपी)अंतर्गत विविध पायाभूत सेवा-सुविधा निर्माण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने १९९९ मध्ये मुंबई रेल्वे विकास महामंडळाची (एमआरव्हीसी) स्थापना केली. नवीन लोकल, रेल्वे मार्ग उभारणे, रेल्वे स्थानकांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी एमआरव्हीसीवर सोपविण्यात आली. यासाठी केंद्र सरकार ५० टक्के आणि राज्य सरकार ५० टक्के निधी उपलब्ध करून देत आहे. या निधीतून पश्चिम आणि मध्य रेल्वेच्या उपनगरीय विभागात विविध कामे पूर्ण करण्यात आली, तर काही कामे प्रगतिपथावर आहेत. एमआरव्हीसीने हाती घेतलेले प्रकल्प राबविण्यात अनेक अडचणी येत असल्याने ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात अडथळे येत आहे. यामुळे प्रवाशांना जीव धोक्यात घालून लोकलमधून प्रवास करावा लागतो. स्थापनेनंतर मुंबईकरांचा रेल्वे प्रवास सुखकर करण्यासाठी एमआरव्हीसीने एमयूटीपी १ योजना तयार केली. या योजनेत नवीन लोकल, नवीन मार्गिका, रेल्वे रुळाशेजारी बॅरिकेट लावणे असे विविध प्रस्ताव तयार केले. एमयूटीपी १ टप्प्याला २००३-०४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली.

या टप्प्यात कुर्ला-ठाणे पाचवी-सहावी मार्गिका, बोरिवली-विरार तिसरी आणि चौथी मार्गिका, ९ डब्याच्या १०१ नवीन लोकल, प्रकल्पात बाधित होणाऱ्या १५ हजार ८५७ नागरिकांचे पुनर्वसन, पश्चिम-मध्य रेल्वे मार्गावर १२ डब्यांच्या लोकल सुरू करण्यात आल्या. एमयूटीपीचा पहिला टप्पा मार्च २०१२ मध्ये पूर्ण करण्यात आला. यामुळे रेल्वेची प्रवासी वाहतूक क्षमता ३६ टक्क्यांनी वाढली. हे प्रकल्प मार्गी लागतानाच एमआरव्हीसीच्या एमयूटीपी २ टप्प्याला २००८-९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पातील योजनांसाठी ८ हजार ८७ कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. या टप्प्यातील मुंबई सेंट्रल-बोरिवली सहावी मार्गिका, सीएसएमटी कुर्ला दरम्यानच्या पाचवी-सहावी मार्गिकेचे काम प्रगतिपथावर आहे. तर ठाणे-दिवा पाचवी-सहावी मार्गिका आणि अंधेरी ते गोरेगाव दरम्यान हार्बर मार्ग विस्तार करण्याचे काम पूर्ण झाले. ऐरोली-कळवा उन्नत मार्ग २०२१-२२ मध्ये पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. विरार-डहाणू रोड मार्गिकेचे चौपदरीकरणाचे काम २०२२-२३ मध्ये पूर्ण होणार होते. मात्र ही कामे सध्या प्रगतिपथावर आहेत.एमयूटीपी ३ ए टप्प्यात हार्बर मार्गिकेचा विस्तार गोरेगाव बोरिवलीपर्यंत करण्यात येणार आहे. बोरिवली-विरार दरम्यान पाचवी-सहावी मार्गिका, कल्याण-आसनगाव दरम्यान चौथी मार्गिका, कल्याण-बदलापूर दरम्यान तिसरी आणि चौथी मार्गिका, तर लांब पल्ल्याच्या आणि उपनगरीय लोकलसाठी कल्याण यार्डची कामे प्रगतिपथावर आहेत. तसेच १९१ वातानुकूलित रेक उपनगरीय रेल्वेच्या ताफ्यात येणार आहेत.

या सर्व कामांसाठी तब्बल ३३ हजार ६९० रुपये खर्च अपेक्षित आहे

# श्री संत गोरा कुंभार युवा प्रतिष्ठान रत्नागिरी व श्री संत गोरा कुंभार हितवर्धक मंडळ दापोली यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य २०२६ प्रीमियर लीग पर्व ३ रे सोहळा दापोली येथे मोठया दिमाखात उत्साहात संपन्न

दापोली,(प्रतिनिधी): कुंभार समाज रत्नागिरी जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष सुभाष गुडेकर ,जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद इवलेकर, जनार्दन मालवणकर, जिल्हा संघटक यशवंत ( नाना ) पालकर व निलेश कुंभार युवकांचे लाडके व्यक्तीमत्व युवा जिल्हाध्यक्ष महेश पडवेकर आणि श्री संत गोरा कुंभार युवा प्रतिष्ठान चे सर्व पदाधिकारी आणि दापोली तालुक्यातील श्री संत गोरा कुंभार हितवर्धक मंडळ पदाधिकारी तसेच आमचे मार्गदर्शक मंडळ अधिकारी प्रकाश गणपत साळवी ,सचिव प्रमोद निवळकर यांच्या अध्यक्षतेखाली

कुंभार समाजातील खेळाडूंच्या क्रीडागुणांना व्यासपीठ देणाऱ्या कुंभार प्रीमियर लीग () या भव्य क्रिकेट स्पर्धेचा सोहळा मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला. या स्पर्धेमुळे समाजातील युवकांमध्ये खेळाविषयीची आवड वाढीस लागली असून एकोप्याची भावना अधिक दृढ झाली आहे. सदर बक्षीस वितरण साठी आवर्जून उपस्थिती

श्रीवर्धन - म्हसळा तालुका कुंभार समाजोन्नती मंडळ, मुंबई अध्यक्ष योगेश इवलेकर, अशोक इवलेकर,दापोली मंडळ सदस्य श्याम लांजेकर उपसचिव संतोष खेडेकर खजिनदार प्रकाश गुणदेकर उपखजिनदार लिलाचंद निवळकर सदस्य दिपक परबलकर विशाल लांजेकर दीपक निवळकर

चिपळूण तालुकाध्यक्ष प्रकाश महाराज निवळकर ,प्रमोद (बाव



शेठ ) निवळकर ,अशोक निवळकर ,खेड तालुकाध्यक्ष अनंत पालकर, सुरेश कडमडकर , डॉक्टरआत्माराम रामा गुणदेकर

आमची लाडकी पुणे टीम किरण कडबडकर - खजिनदार , कोकणस्थ कुंभार समाज पिंपरी चिंचवड पुणे ,

सुहास शिरकर (साळवी) कोकणस्थ कुंभार समाज युवा आघाडी अध्यक्ष

अजय साळवी युवा आघाडी खजिनदार,संजय निवळकर सचिव युवा,आघाडी, विजय निवळकर

ओंकार साळवी साहिल साळवी,संदीप शिरकर युवा आघाडी पदाधिकारी उपस्थितहोते

जिल्हाध्यक्ष सुभाष गुडेकर आणि

श्रीवर्धन - म्हसळा तालुका कुंभार समाजोन्नती मंडळ, मुंबई अध्यक्ष

योगेश इवलेकर यांच्या भाषणाने सर्वांना नक्कीच प्रेरणा मिळेल

८ संघा मध्ये ही स्पर्धा होती सदर क्रिकेट लीग चा निकाल अश्या प्रकारे

८ व्या स्थानी मनू इलेव्हन गुहागर

७ व्या स्थानी लोकराज ११ दापोली

६ व्या स्थानी पर्निका ओरिअर्स रत्नागिरी

५ व्या स्थानी अविर इलेव्हन मंडणगड आणि फायनल निकाल

चौथे क्रमांक बक्षीस ऍक्टिव्ह रेक्स लांजा

तिसरे क्रमांक बक्षीस जय भवानी ११ संगमेश्वर

दुसरे क्रमांक श्री समर्थ कन्ट्रक्शन दापोली

आणि प्रथम क्रमांकाचे मानकरी सुरवाती ला अपयश आले पण जिद्द आणि मन एकाग्रतेने खेळून धडाकेबाज फलंदाजी आणि गोलंदाजी च्या जोरावर श्री संत गोरा कुंभार चषका वर नाव कोरलेली टीम

परशुराम इलेव्हन चिपळूण

मॅन ऑफ द सिरीज बाप्पा निवळकर टीम दापोली:

( सायकल अमित बुरबाडकर यांच्या कडून)

बॅट्समन - प्रियेश पडवेकर (टीम संगमेश्वर)

बॉलर - दिगंबर गुहागरकर (टीम दापोली)

फिल्डर - मदन पडवेकर (टीम चिपळूण)

उगवता तारा - आर्यन गुहागरकर (टीम रत्नागिरी)

स्पर्धेच्या प्रत्येक दिवशी रंगतदार व चुरशीचे सामने पाहायला मिळाले. फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षणातील उत्कृष्ट कामगिरीमुळे प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून खेळाडूंना प्रोत्साहन दिले. अंतिम सामन्यातील थरारक खेळाने उपस्थित क्रिकेटप्रेमी भारावून गेले.

कुंभार प्रीमियर लीगचे यशस्वी आयोजन करण्यासाठी आयोजक समिती, पंच, स्वयंसेवक, सहकारी संस्था व सर्व संघांचे योगदान मोलाचे ठरले. खेळाडूंनी खेळाडूवृत्ती जपत दाखवलेली शिस्त व संघभावना विशेष उल्लेखनीय होती.

समारोपप्रसंगी विजेत्या व उपविजेत्या संघांना आकर्षक चषक व पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच उत्कृष्ट फलंदाज, सर्वोत्तम गोलंदाज, मालिकावीर व उदयोन्मुख खेळाडू यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. समालोच विक्रांत टेरवकर आणि सूत्रसंचालन सुधीर जामसुतकर यांनी केले

एकूणच, कुंभार प्रीमियर लीग स्पर्धा समाजातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरली असून भविष्यातही अशा क्रीडास्पर्धांच्या माध्यमातून समाजातील एकता व क्रीडासंस्कृती अधिक बळकट व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. आपल्या रत्नागिरी जिल्हा कुंभार समाज बांधवांमुळे हे उपक्रम यशस्वी झाले आपले हे प्रेम कायम आमच्या पाठीशी राहो तरी आपल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त अनिल पडवेकर यांनी केले.

# राबगाव जि. प. गट, पं. स. गणात भाजपने मारली बाजी. विरोधकांचा धुरळा राजकीय अष्टपैलू रवीशेठ देशमुख यांनी आपला मैदान जिंकला आणि गुलाल उधळला

रायगड जिल्हा उत्तर उपसंपादक / मंगेश यादव: सुधागड तालुक्यात राबगाव जिल्हा परिषदगट, पंचायत समिती गणात राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा, आरपीआय युती विरुद्ध शेकाप,उबाठा, शिंदे गट शिवसेना यांच्यामध्ये काटे की टक्कर असा सामना पाहायला मिळाला. भाजपा युतीपुढे विरोधकांनी मोठे आव्हान उभे केले होते. विजयाच्या नांदीच्या घोषणा देत हवेत गोळी मारत होते. परंतु राबगाव हा मैदान सर करण्यासाठी विरोधकांचा धुरळा उडवण्यासाठी राजकीय अष्टपैलू, मैदानात चॅलेंज देणारे, हवेत गोळ्या मारणाऱ्यांना न घाबरणारे वेळ आली तर ८० तिथे ८५ पण कमी नाही खेळ करणारच म्हणून सुधागड तालुक्यात नामवंतांचा पराभव करणारे भाजपनेते रवीशेठ देशमुख यांनी स्वतःची राजकीय खेळी चालू केली. ठाकूर आदिवासी समाजाला एकत्र करून पूर्ण तालुका बांधी केली. आदिवासी पाड्यांवर भाजपा नेत्या गीता ताई पारलेचा, आलाप भाई, श्रीकांत ठोंबरे अरिप मणियार, आदी नेते कार्यकर्ते यांना घेऊन गाव बैठका घेतल्या. आदिवासी ठाकूर समाजाचे अध्यक्ष गोविंद लेंडी, कातकरी आदिवासी समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वाघमारे, आदिवासी बांधव, कार्यकर्ते, नेहमी आपला मैदान गाजवणारे



विश्वासू कार्यकर्ते यांची फील्डिंग राबगाव मैदान गाजवण्यासाठी भाजपा पक्षाचा गुलाल उधळवण्यासाठी राब गाव गडात मजबूत लावली होती. यावेळी गोविंद लेंडी, भगत भाऊ, सुनील ठोंबरे, चंद्रकांत वाघमारे, कृष्णा वाघमारे यांनी खूप मेहनत घेतली.स्वतः रवीशेठनी चिखलगाव ग्रामपंचायत मध्ये ६०० मताचा गठ्ठा पुरा केला. भाजप युती मधील कार्यकर्त्यांनी, रवीशेठ देशमुख यांच्या शब्दाला मान देऊन कार्यकर्ते मतदान केंद्रावर जातीने काम करत होते. खासदार धैर्यशील दादा पाटील यांनी राबगाव जि. प. गट, पंचायत स. गणाची जबाबदारी रवीशेठ देशमुख यांच्यावर सोपविल्याने जिल्हा परिषद गटाचे उमेदवार चंद्रकांत कृष्णा वारगुडा, पं. स. गणाचे उमेदवार सौ सुनीता किसन लेंडी यांना आपली स्वतःची राजकीय खेळी करून भाजप खासदार धैर्यशील दादा पाटील, नेत्या गीता ताई, आलाप भाई, श्रीकांत ठोंबरे, अरिफ मणियार यांच्या सहकार्याने, कार्यकर्त्यांच्या मदतीने बहुमताने निवडून आणले. विजयाची बातमी कळतात आरपीआय, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा, आदिवासी ठाकूर, आदिवासी कातकरी समाज नेते, कार्यकर्ते यांनी एकच जल्लोष करून, फटाक्याच्या आतिषबाजी करून दोन्ही विजय उमेदवारांना उचलून घेऊन,विजयाचा गुलाल उधळला, जल्लोष करत विजय उत्सव साजरा केला आणि प्रथम रवीशेठ देशमुख यांच्या निवास स्थानी जाऊन भेट घेतली त्या वेळी रवीशेठ देशमुख म्हणाले हा सत्याचा व विकासाचा, तुमच्या मेहनतीचा व तुमचा माझ्यावर असलेल्या विश्वासाचा विजय आहे. आपला पारंपारिक मैदान तुम्ही राखलात. अशा भावना व्यक्त केल्याने कार्यकर्ते व नेत्यांच्या भावना उंचावल्या आपल्या विभागात विकासाचा आराखडा तयार करा निधी आणून कामे पूर्ण करण्याची जबाबदारी माझी असे बोलून विजयाचे श्रेय कार्यकर्त्यांना देऊन त्यांच्याबरोबर आनंदोत्सव साजरा केला.

# नविन पनवेल येथे रोजगार मेळावा संपन्न

पनवेल प्रतिनिधी-सुनील जाधव

नवी मुबंई आदर्श शैक्षणिक समुहाच्या प्रांगणात भविष्याला योग्य दिशा देणारा तरुणाईच्या आशांना नवे आकाश देणारा भव्य रोजगार मेळावा सपंन्न झाला.

यशंवतराव चव्हाण महाराष्ट मुक्त विद्यापीठ,नाशिक पदवीधर प्रकोष्ठ ,भारतीय जनता पार्टी ,आदर्श शैक्षणिक समुह नविन पनवेल आणि युवा शक्ती फाउडेंशन यांच्या संयुक्त विद्यामाने हा कार्यक्रम म्हणजे केवळ नोक-यांचे व्यासपीठ नव्हे तर युवकांच्या कर्तुत्वाला आकार व दिशा देणारा प्रेरणादायी ठरला या कार्यक्रमाला निरंजन डावखरे आमदार, कैलाश मोरे (य.च.म.मु.वि. नाशिक) डॉ.सतीश पवार ,डायरेक्टर युवा फाऊडेंशन ,वामन नाखले ,विभागीय संचालक, मुबंई विभागीय केंद्र (य.च.म.मु.वि.नाशिक) , प्रशांत कांबळे, सगिंता विसपुते, तसेच विविध क्षेत्रा मधुन आलेले उद्योजक ,कंपनी प्रतिनिधी ,पालक आणी हजारो युवक-युवती सहभागी झाल्या होत्या.तर क्षैशणिक पात्रतेनूसार त्यांना नोकरीचे कॉलचे वाटप करण्यांत आले.



# प्राण्यांपासून माणसांना व माणसांपासून प्राण्यांना होणाऱ्या आजारांबाबत पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन जनजागृती मोहीम पाली येथे संपन्न

रायगड जिल्हा उत्तर उपसंपादक / मंगेश यादव : सुधागड तालुक्यात प्राण्यांपासून माणसांना होणारे व माणसांपासून प्राण्यांना होणारे आजार यासंदर्भात मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय( नागपूर )

तसेच पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती पाली - सुधागड- जि. रायगड येथे दिनांक १०/२/२६ रोजी जनजागृती मोहीम कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमात ४३ लाभार्थ्यांना स्वच्छता संच वितरित करण्यात आले यावेळी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.अशोक गाढवे,

सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन खालापूर तसेच डॉ.सुयोग मस्कर, पशुधन विकास अधिकारी ( विस्तार)सुधागड पाली आणि श्रीमती लता मोहिते गटविकास अधिकारी पंचायत समिती सुधागड यांनी विशेष अतिथी म्हणून सहभाग घेतला

व झूनॉटीक आजारांविषयी जनजागृतीवर लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ.विलास वैद्य, प्राध्यापक व प्रकल्प () यांनी या आजारांचे प्रतिबंध व नियंत्रण तसेच वैयक्तिक स्वच्छतेचे महत्व या विषयांवर व्याख्यान दिले. डॉ.जगदीश गुडेवार सहयोगी प्राध्यापक व सह प्रकल्प प्रमुख (- ) यांनी सामान्य या आजारा आणि वन हेल्थ संकल्पनेवर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. नम्रता काठोळे, पशुधन विकास अधिकारी पाली युवराज सुरकुले, पशुधन पर्यवेक्षक प्रकाश बुलबुले, पर्यवेक्षक श्रीमती पल्लवी भालेराव, पर्यवेक्षक व मिस वृषाली कदम यांचे मोलाचे योगदान लाभले. हा कार्यक्रम डॉ. शैलेश इंगोले, सहयोगी अधिष्ठाता, मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय मुंबई डॉ. रवींद्र झेंडे, प्राध्यापक व विभाग प्रमुख पशुवैद्यकीय सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच सहल

प्रकल्प प्रमुख (-) डॉ. प्रशांत कांबळे, प्रादेशिक सहायुक्त पशुसंवर्धन, मुंबई विभाग आणि डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा उप आयुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अलिबाग रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या जनजागृती कार्यक्रम पार पडला.



## बामणोली येथे १९ रोजी शिवजयंती उत्सव अशोक वनगे आणि कुणबी समाज संघटना बामणोली यांचे आयोजन

चिपळूण (वार्ताहर) : तालुक्यातील बामणोली येथे कुणबी समाज संघटना शाखा बामणोली व सामाजिक कार्यकर्ते अशोक वनगे आणि परिवार यांच्या माध्यमातून गुरुवार दिनांक १९ रोजी शिवजयंती उत्सव आयोजित करण्यात आला आहे. यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन वनगे परिवार तर्फे करण्यात आले आहे.ङ्गङ्गगुरुवारी सकाळी ९.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे विधी व पूजन, सकाळी १०.३० वाजता श्री सत्यनारायण महापूजा, सकाळी ११ ते १ वाजता छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मिरवणूक, दुपारी १ ते २.३० शिवभोजन, दुपारी ३ ते ४ मान्यवरांचा सत्कार व शालेय विद्यार्थी मनोगत, सायंकाळी ५ वाजता महिला हळदीकुंकू समारंभ, रात्री ७ वाजता ह भ प कुमारी ईश्वर येसरे कळंबनी खेड यांचे कीर्तन, रात्री ९ वाजता शिवभोजन, आणि रात्री ११ वाजता जय भराडीन देवी नमन खानवली चिंचवाडी लांजा यांचा कार्यक्रम होईल ङ्मया शिवजयंती कार्यक्रमाला गुहागर विधानसभेचे आ. भास्कर जाधव, समाज नेते राजेश बेंडल, कुणबी समाजोन्नती संघ सहसचिव माधव कांबळे, कुणबी संघ शाखा चिपळूण मुंबई अध्यक्ष चंद्रकांत कोकमकर, कुणबी संघ शाखा ग्रामीण चिपळूण अध्यक्ष अॅड.भाई कुळे, सरपंच सुदेश गमरे, उपसरपंच शांताराम चांदिवडे, श्री वाघेश्वरी ग्रामदेवता ट्रस्ट अध्यक्ष सिताराम तांबे, नवजवान मित्र मंडळ किजबिलेवाडी मुंबई अध्यक्ष सुरेश चांदिवडे, कुणबी संघटना बामनोली अध्यक्ष तानाजी वणे, सचिव नरेश पागडे, नवजवान मित्र मंडळ किजबिलेवाडी स्थानिक अध्यक्ष दत्ताराम फावरे आणि आरती निराधार सेवा फाउंडेशन मालघर येथील शिक्षक व विद्यार्थी वर्ग आधी मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या शिवजयंती उत्सवाला सर्वांनी आवर्जून उपस्थिती रहावे, असे आवाहन अशोक वनगे यांनी केले आहे.ङ्ग१०)

## राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील ५,०१२ सहायक प्राध्यापक पद भरतीस मान्यता

मुंबई : राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ( २०२०) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गातील ५ हजार १२ रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे.अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार प्राध्यापकांची रिक्त पदे भरणे अनिवार्य होते. याच पार्श्वभूमीवर हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

भरती प्रक्रियेच्या प्रमुख अटी व शर्ती:-

विद्यार्थी संख्येवर आधारित पदे दि.१ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येनुसार निश्चित झालेल्या कार्यभाराच्या आधारे ही ५,०१२ पदे भरली जातील.



ही भरती प्रक्रिया विहित कालमर्यादेत आणि पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबवण्याची जबाबदारी उच्च शिक्षण संचालक (पुणे) आणि विभागीय सहसंचालकांची असेल.

मानांकन अनिवार्य ज्या शैक्षणिक संस्थांकडे नॅक मान्यता आहे, त्यांनाच नवीन पदनिर्मितीचा लाभ मिळेल. मात्र, ज्यांचे मूल्यांकन कमी आहे, त्यांना सुधारणेसाठी ३ वर्षांचा सवलतीचा कालावधी देण्याबाबत शासन स्वतंत्र धोरण आखणार आहे.

आचारसंहितेचे पालन- भरती प्रक्रियेदरम्यान राज्यात आचारसंहिता लागू असल्यास, निवडणूक आयोगाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.सूचनांचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारी संचालक,उच्च शिक्षण पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदांचा सुधारित आराखडा (आकृतीबंध) निश्चित करण्यासाठी उच्च शिक्षण संचालकांच्या स्तरावर एक समिती नियुक्त केली जाणार आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# लोकरंजन

१ सिनेरंग

तू या मैं'चा म्युझिक लॉन्च सोहळा ठरला शानदार

रोमँटिक 'जी लिया'पासून 'फेम अस'*च्या




जोरदार एनर्जीपर्यंत आणि 'नाम करू बडा'*च्या रॉ बीट्सपर्यंत, 'तू या मैं'चा अल्बम प्रेमाला रॅप आणि हिप-हॉपसोबत प्रभावीपणे जोडतो. हा अल्बम बोल्ड, फ्रेश आणि प्रेक्षकांना सहज जोडणारा साउंडस्केप तयार करतो. चित्रपटाच्या रिलीजच्या काही दिवस आधीच मेकर्सनी नॉस्टॅल्जिक पण कंटेम्परररी 'आंखें चार' हे गाणं रिलीज केलं, ज्याने क्षणातच तरुणाईच्या मनाला स्पर्श केला आणि संपूर्ण वातावरण व्हाइबमध्ये बदलून टाकलं.

तू या मैं'च्या संगीताचं भव्य आणि पॉवर-पॅक्ड लॉन्च करण्यात आलं, जे एक अविस्मरणीय ठरल. या कार्यक्रमाला शनाया कपूर, आदर्श गौरव, दिग्दर्शक बेजॉय नांबियार, निर्माते आनंद एल राय आणि हिमांशु शर्मा यांच्यासह ७ बंटाइझ आणि संपूर्ण टीम उपस्थित होती. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह आणि जबरदस्त एनर्जी पाहायला मिळाली. आदर्श गौरवने 'नाम करू बडा'*वर दमदार परफॉर्मन्स देत स्टेज गाजवला, तर 'जी लिया'*ने प्रेक्षकांच्या मनाला भिडलं.शनाया कपूर, आदर्श गौरव, परुल गुलाटी आणि अंशसह संपूर्ण स्टारकास्टने ७ बंटाइझसोबत *'फेम अस'*वर भन्नाट परफॉर्मन्स सादर केला, ज्यामुळे संपूर्ण हॉल थिरकायला लागला.

बेजॉय नांबियार दिग्दर्शित 'तू या मैं' या चित्रपटाची निर्मिती कलर यलो बॅनरखाली आनंद एल राय आणि हिमांशु शर्मा यांनी केली आहे. हा चित्रपट 'तू या मैं' १३ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

२व्हर्च्युअल स्टुडिओमध्ये चित्रित केलेला भारतातील पहिला म्युझिक व्हिडिओ शरमणा

गायक, संगीतकार आणि दिग्दर्शक रामजी गुलाटी यांनी त्यांचा नवीनतम एकल ''शरमणा'' रिलीज केला आहे, जो आता सर्व प्रमुख डिजिटल प्लॅटफॉर्मवर स्ट्रीमिंग होत आहे. के सेरा सेरा सादर करत असलेले हे गाणे भारतीय संगीत निर्मितीतील एक महत्त्वाचा क्षण आहे कारण एआय इंटिग्रेशनसह पूर्णपणे व्हर्च्युअल स्टुडिओ वातावरणात तयार केलेला हा पहिला म्युझिक व्हिडिओ आहे, जो व्हिज्युअल स्टोरीटेलिंगसाठी एक नवीन बेंचमार्क स्थापित करतो.

शरमणा पारंपारिक संगीत व्हिडिओंच्या सीमा ओलांडून दृश्यात्मकदृष्ट्या तल्लीन करणारा अनुभव देण्यासाठी समकालीन भारतीय पॉपला व्हर्च्युअल प्रोडक्शन तंत्रज्ञानाशी जोडते. डिजिटली तयार केलेल्या वातावरणाचा आणि नियंत्रित व्हर्च्युअल सेट्सचा वापर करून, हा प्रकल्प मुख्य प्रवाहातील मनोरंजनात तंत्रज्ञानावर आधारित सर्जनशीलतेकडे वाढत असलेल्या बदलाचे प्रतिबिंबित करतो.

या म्युझिक व्हिडिओमध्ये अभिनेता रोहन मेहरासोबत नवोदित अभिनेत्री हिया आहे,




ज्यामध्ये बिग लव्हचे रॅप व्होकल्स आणि कुंवर जुनेजा यांनी लिहिलेले गीत आहे. एकत्रितपणे, सहयोगी कामगिरी, फॅशन आणि शैलीबद्ध व्हर्च्युअल व्हिज्युअल्स एकत्र आणून एक आकर्षक ऑन-स्क्रीन कथा तयार करतात.

३झी स्टुडिओजच्या 'सुपर डुपर'चा टीझर प्रदर्शित!

आपल्याकडे कौटुंबिक गोष्टी आवडीने बघणारा एक मोठा प्रेक्षकवर्ग आहे. कुटुंबातील सुख दुःखाच्या गोष्टीत रमणारा, कथेतील पात्रांसोबत हसणारा- रडणारा.. त्या पात्रांमध्ये स्वतःचा शोध घेणारा हा प्रेक्षकवर्ग नेहमीच कौटुंबिक विषयांना भरभरून दाद देतो. अशा सर्वच स्तरांतील, वयोगटातील आणि विविध भागांतील प्रेक्षकांना आवडेल, रुचेल आणि मनापासून भावेल अशीच गोष्ट असणारा सुपर डुपर हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. झी स्टुडिओजची प्रस्तुती, नाईंटी नाईन प्रॉडक्शन्स तथा सिद्धिविनायक प्रॉडक्शन्सची निर्मिती आणि समीर आशा पाटील यांचे दिग्दर्शन असलेल्या सुपर डुपर या चित्रपटाचा धमाकेदार टीझर नुकताच सोशल मीडियावर प्रदर्शित झाला आहे.

या टिझरमधून चित्रपटातील एकाहून एक सरस कलाकारांची झलक बघायला मिळाली आहे. निर्मिती सावंत, शशांक शेंडे, हृषिकेश जोशी, नम्रता संभेराव, कुशल बद्रिके, प्रतीक्षा कोते आणि मुख्य नायक नायिकेच्या भूमिकेत असलेले ललित प्रभाकर आणि विदुला चौगुले अशी भलीमोठी स्टारकास्ट यामध्ये झळकणार आहे. कौटुंबिक महासोहळा अशी टॅगलाईन असलेला हा चित्रपट येत्या ३ एप्रिलला प्रदर्शित होणार असून टीझरमुळे प्रेक्षकांची उत्सकुता वाढली आहे. या चित्रपटाचे विजय शिंदे आणि नरेश बोर्डे निर्माते आहेत. तर उमेश कुमार बन्सल, बवेश जानवलेकर प्रस्तुतकर्ता आहेत.

४ टेलीनामा

पंचकन्यांचा प्रहार करणार अन्यायाचा संहार, जुळली गाठ गं मालिकेत मोठा ट्विस्ट

सन मराठी वाहिनीवरील जुळली गाठ गं या मालिकेत सध्या मोठा ट्विस्ट पाहायला मिळत आहे. मालिकेत सावी व धैर्य या दोघांना वेगळं करण्यासाठी दामिनी सातत्याने कट रचत आहे. काही दिवसांपूर्वी सावीच्या आयुष्यात अंगद हा व्यक्ती आला. भाऊंचा विद्यार्थी असल्याचा बनाव करत स्वतःच्या बिझनेस साठी त्याने सावीकडे मदत मागितली. मदतीसाठी होकार देऊन सावी नकळत या प्रकरणात अडकते. सावी वर अंगदला आत्महत्या साठी प्रवृत्त करण्याचा आणि अंगदचा विनयभंग केल्याचा आरोप लावून अटक करण्यात येते. या प्रकरणातून निर्दोष सुटण्यासाठी सावी ही लढाई लढत आहे. या लढाईत सावीच्या मदतीसाठी सन मराठी वरील सदस्य एकत्र येणार आहेत. इन्स्पेक्टर मंजू सुरुवातीपासूनच सावीच्या मदतीसाठी धावून आली आहे. तर कायद्याच्या कचाट्यातून सोडवायला राणी देखील सावी सोबत उभी आहे. पण आता अर्पिता, अनुप्रिया, आणि वैदही यांचीही साथ सावीला मिळणार आहे. राणी, मंजू, अर्पिता, अनुप्रिया, वैदेही या पंचकन्या सावीला कसं निर्दोष सिद्ध करतील? आणि हे करताना त्यांना कोणत्या अडचणींना सामोरं जावं लागेल? याकडे संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागून राहील आहे. या सर्व सीनसाठी आम्ही सगळ्यांनी प्रचंड मेहनत घेतली आहे त्यामुळे प्रेक्षकांना मी विनंती करेन हा भाग अजिबात चुकवू नका.

हा अंतिम निकालाचा टप्पा पाहायला विसरू नका, १६ फेब्रुवारी दुपारी १ आणि सायं. ७ वा. सन मराठीवर.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क -९८३३१४६३५६**
**इमेल -**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय

शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## श्री सोमजाई प्रसारक मंडलाचे माध्यमिक विद्यालय पाच्छापूर येथे वार्षिक बक्षीस वितरण सोहळा संपन्न





सुधागड पाली/ राम तुपे

श्री . सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाचे माध्यमिक विद्यालय पाच्छापूर येथे वार्षिक बक्षीस वितरण सोहळ्याचे आयोजन ११ फेब्रुवारी रोजी करण्यात आले. या सोहळ्यात संस्थेचे अध्यक्ष श्री .दादासाहेब घोसाळकर ,प्रमुख पाहुणे श्री. भगवान डिघे, खजिनदार श्री.एकनाथ ओंबळे ,संचालक श्री .पांडुरंग डिघे, श्री. किसन मोरे, श्री. सिद्धांत गायकवाड ,माध्यमिक विद्यालय पाच्छापूरचे मुख्याध्यापक श्री. दिपक माळी सर ,ज्येष्ठ शिक्षक श्री सुचिर खाडे सर ,सौ.दिव्या जंगम ,सौ. सारिका गायकवाड ,श्री.संदीप डिंगळे ,प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.माधुरी पारखे मॅडम, शिक्षक वृंद श्री .दिनेश दिघे सर तसेच प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते .कार्यक्रमाचा शुभारंभ स्वागत गीताने करण्यात आला .उपस्थित मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री दिपक माळी सरांनी केले तर सूत्रसंचालन दिव्या जंगम मॅडम यांनी केले .यशस्वी गुणवंत कार्यनिष्ठ खेळाडू वृत्ती असलेल्या विद्यार्थ्यांचे गुणगौरव उपस्थित मान्यवरांनी सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन केले . बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजक श्री.सुचिर खाडे सर यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## घरडा अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे सायक्लोथॉन सायकल रॅलीचे आयोजन

घरडा अभियांत्रिकीच्या आयडिया, इनोव्हेशन, इन्क्युबेशन आणि एंटरप्रेन्योरशिप (आयआयआयई ) सेल तर्फे यावर्षी कोकणामध्ये प्रथमच सायकल रॅली (सायक्लोथॉन) यशस्वी रित्या संपन्न झाली. ही रॅली घरडा अभियांत्रिकी महाविद्यालयातून सुरु होवून चिपळूण कळंबस्ते पर्यंत २० कीलोमीटर अंतराची आयोजित करण्यात आली होती. या रॅलीचा उद्देश लोकांमध्ये उद्योजक बना, आयडीयातून इन्व्होवेशनकडे वाटचाल, तंदुरुस्त राहा तसेच सामान्य लोकांमध्ये नवोपक्रम, स्टार्टअप्स आणि उद्योजकीय संधींबद्दल जागरूकता निर्माण करणे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नवोपक्रम-चलित विकासाच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत असलेल्या कल्पना निर्मितीपासून औद्योगिक-साक्षात्कारापर्यंतच्या प्रगतीशील प्रवासाचे प्रतीक म्हणून सायक्लोथॉनने काम केले. या रॅलीमध्ये महाविद्यालयातील २३ विद्यार्थ्यांनी व २ अध्यापक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे नियोजन आयआयआयई सेलचे प्रमुख डॉ. समीर गजमल यांनी यशस्वीरित्या पार पाडले यासाठी त्या त्यांना एनएसएसचे प्रा. विनायक माळी आणि स्वयंसेवक यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद पाटील, उपप्राचार्य डॉ.सचिन पाटील व रजिस्ट्रार प्रा.संदिप मुनघाटे व महाविद्यालयाच्या सिक्युरीटी टीमचे मोलाचे सहकार्य लाभले.




## आकले गावचा शौर्य प्रसाद वनगे याने मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय युनिफाईड स्पर्धेत मिळवले रौप्यपदक !



उपसंपादक प्रदीप पवार

पनवेल येथे पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेत चिपळूण तालुक्यातील आकले निंबारेवाडी येथील शौर्य प्रसाद वनगे याने रौप्यपदक मिळवून दैदीप्यमान यश संपादन केले आहे. कु.शौर्य वनगे हा सध्या पुणे येथे शिक्षण घेत असून तो संकल्प फाउंडेशन महाराष्ट्र या संस्थेचा विद्यार्थी आहे. या खेळासाठी विविध शाळेतून विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. मात्र शौर्यने उत्कृष्ट चपळता दाखवत प्रतिस्पर्ध्याला नमवले. यामध्ये शौर्यची मेहेनत आणि त्याच्या मार्गदर्शकांचे योगदान मोठे आहे. त्याच्या या कामगिरीने आकले गावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असल्याने समाजसेवक विनेश भाऊ मोहिते सामाजिक विकास ग्रुपकडून त्याचे अभिनंदन करण्यात आले असून त्यास पुढील यशासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## परशुराम एज्युकेशन सोसायटी संचालित शिशुविहार पोफळी विभागामध्ये आज दिनांक १२.२.२०२६ वार गुरुवार रोजी पौराणिक बोधकथा तसेच आरोग्याच्या सवयी, बालवयातील गमती जमती, संस्कार ,या विषयावर आधारित चर्चासत्र कार्यक्रम राबविण्यात आला

परशुराम एज्युकेशन सोसायटी संचालित शिशुविहार पोफळी विभागामध्ये आज दिनांक १२.२.२०२६ वार गुरुवार रोजी पौराणिक बोधकथा तसेच आरोग्याच्या सवयी, बालवयातील गमती जमती, संस्कार ,या विषयावर आधारित चर्चासत्र कार्यक्रम राबविण्यात आला

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीचे सेवानिवृत्त कर्मचारी, तसेच पोफळी शाळेचे माजी विद्यार्थी ह. भ. प श्री. प्रकाश भगवान जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहीले.

शिशुविहार विभाग प्रमुख सौ. सुप्रिया शैलेश वारे मॅडम यांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली तसेच पाहुण्यांबद्दल थोडक्यात माहिती व्यक्त केली.

सौ.उज्वला जाधव मॅडम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शिशुविहार मधील सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत वारे मॅडम यांच्या हस्ते श्रीफळ देऊन प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

सौ. सलोनी घाणेकर मॅडम यांनी सुवाच्छ अक्षरात कार्यक्रमाचे फलक लेखन केले. प्रमुख पाहुणे ह. भ. प श्री. प्रकाश भगवान जाधव यांनी विद्यार्थ्यांना पौराणिक बोधकथा सांगितली तसेच त्यांच्या काळातील बालवयातील गमतीजमती तसेच शाळेबद्दलचे ,शिक्षकांबद्दलचे अनुभव व्यक्त केले,

त्याचबरोबर त्यांच्या शालेय जीवनातील विद्यार्थी कसा होता आणि आज सद्यस्थितीतील आधुनिक स्मार्ट युगातील विद्यार्थी कसा आहे यावर विद्यार्थ्यांची सोप्या भाषेत चर्चा करून संवाद साधला. ङ्गआपल्या बालवयातील शाळेतील एक कविता सादर केली. विद्यार्थ्यांना आरोग्याबाबत काळजी कशी घ्यावी जेवणाच्या चांगल्या सवयी तसेच वडीलधाऱ्यांबद्दल मानसन्मान आणि संस्कार कसे असावेत याबाबत मार्गदर्शन केले या सर्वांवर आधारित बोधयुक्त कथा सांगितली त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसोबत वैयक्तिक संवाद साधला विद्यार्थ्यांशी प्रश्नमंजुषा खेळण्यात आली.

आपले गुरु आपले शिक्षक आपले आई-वडील यांच्या बद्दल आदरणीय पूजनीय वंदनीय असावे या शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत कथेतून अर्थ समजावून सांगितला त्याचप्रमाणे मोठा गट शिक्षिका सौ . वेदांकी कदम मॅडम यांनी मोठ्या गटातील विद्यार्थ्यांकडून पसायदान म्हणून घेतले. कार्यक्रमासाठी लाभलेले प्रमुख पाहुणे गावचे ज्येष्ठ नागरिक ह. भ. प श्री. प्रकाश भगवान जाधव यांनी विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांशी हितगुज साधून वेगवेगळ्या चर्चा ,गप्पा, अनुभव तसेच कथेतून चांगला बोध दिला.





## डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा शहीदी जन्मशताब्दी वर्ष कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा शहीदी जन्मशताब्दी वर्ष कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल मंडणगड येथे श्री गुरु तेग बहादूर साहेब जी यांचा ३५० वा शाहिदी जन्मशताब्दी वर्ष,शाळेचे आदरणीय उपमुख्याध्यापक श्री अर्जुन हल्लोळी सर यांच्या अध्यक्षतेखाली श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उत्साह साजरा करण्यात आला. सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ ज्योती राणे यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले. शाळेच्या वतीने श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेचे आदरणीय पर्यवेक्षक श्री.शांताराम बैकर, शिक्षक प्रतिनिधी श्री बसवंत शिरगिरे, प्राध्यापक श्री अशोक गोरड, ज्येष्ठ शिक्षिका शकुंतला वाघमारे मॅडम, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. साहिबजी यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून विद्यालयातील पंधरा विद्यार्थ्यांनी श्री गुरु तेज बहादूर साहिबजी यांचेजीवन व कार्याविषयी माहिती सांगितली. विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक श्री प्रकाश हेलोंडे सर यांनी श्री गुरुदेव बहादुर साहेब जी यांचे जन्म, नाव करण, शांतता,मानवी हक्क धार्मिक सहिष्णुता, अन्याय-अत्याचारा विरोधात लढा, हिंद दि चादर अशा त्यांच्या विविध गोष्टींविषयी, जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री विठ्ठल केंद्रे यांनी श्री. गुरुदेव बहादूर साहिबजी यांच्या३५०व्या जन्मशताब्दी निमित्त वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत,त्या स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी भाग घेऊन व त्या गोष्टींची माहिती पुस्तके,गुगलवर सर्च करून सांगावी असे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व शाळेचे मा.उपमुख्याध्यापक श्री.अर्जुन हुल्लोळी सर यांनी श्री गुरु तेज बहादूर साहिबजी यांचे जीवन कार्य तसेच त्यांच्या जीवन कार्याविषयी पंधरा वडा साजरा करण्यात येणार आहे त्यानिमित्त प्रभात फेरी, वक्तृत्व,निबंध, चित्रकला,प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धा घेण्यात येणार आहे त्या स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले या स्पर्धा निमित्त शाळा तुम्हाला चांगल्या प्रकारे व्यासपीठ निर्माण करून देते याचा फायदा जास्तीत ते विद्यार्थ्यांनी घ्यावा असे सांगितले.शेवटी सौ ज्योती राणे मॅडम यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.




भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )